**महाराष्ट्र शासन (कारागृह विभाग)**

**येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे - ०६**

**ई-मिल आयडी :-** १. अधीक्षक ई-मेल आयडी :- **yerwadacanteen19@gmail.com**

२. डी.आय.जी.ई-मेल आयडी :- **digwrpune@gmail.com**

# ई-दरपत्रक निविदा

येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे - ०६ यांचे अधिपत्याखालील येत असलेल्या या कारागृहामध्ये बंदीस्त असलेल्या बंदयांना उपहारगृहामार्फत **माहे एप्रिल - २०१९ ते जून - २०१९** या कालावधीकरीता लागणाऱ्या सोबतच्या यादीतील दूध व दुग्धजन्य पदार्थांची खरेदी ई-दरपत्रक निविदा पध्दतीने करावयची आहे. सदर निविदा भरण्यास इच्छुक असतील त्यांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सादर करावे. ई-दरपत्रक प्रक्रियेसाठी **तांत्रिक अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २०.०२.२०१९ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत व व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) दिनांक २१.०२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-०६ यांचे समोर उघडण्यात येतील.**

## निविदेबाबत अटी व शर्ती

१. पुरवठादाराकडून ई-दरपत्रक प्रक्रियेसाठी तांत्रिक अर्ज व व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) असे दोन प्रकारचे अर्ज सादर करणे.

२. पुरवठादार यांनी तांत्रिक अर्ज जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अधीक्षकांच्या **yerwadacanteen19@gmail.com** या ई-मेल आयडीवर व मा. कारागृह उपमहानिरीक्षक यांचे **digwrpune@gmail.com** या ई-मेल आयडीवरही विहीत मुदतीत पाठविणे. तांत्रिक अर्ज भरण्याची अंतिम तारीख व वेळ उलटल्यानंतर येणारा कुठलाही तांत्रिक अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

३. पुरवठादाराने व्यावसायिक दरपत्रकाचा नमुना **www.mahaprisons.gov.in** या संकेतस्थळावर देण्यात आलेला असून त्यावरुन डाऊनलोड करुन घेण्यात यावा. पुरवठादाराने व्यावसायिक दरपत्रकावर दर नमूद करुने ई-दरपत्रक प्रक्रिया उघडण्याच्या दिवशी स्वत: सिलबंद पाकिटात घेऊन येणे आवश्यक आहे. पुरवठादाराने व्यावसायिक दरपत्रक स्वतःच्या संस्थेच्या अधिकृत लेटर हेडवर देणे.

४. व्यावसायिक दरपत्रक निविदेमध्ये वस्तूंचे दर निविदा नमुन्यामध्ये निर्दिष्ठ केलेल्या परिमाणानुसार सुस्पष्ठ नमूद करणे आवश्यक आहे.

५. व्यावसायिक अर्ज (दरपत्रक) उघडण्याच्या दिवशी संबंधीत पुरवठादार अथवा त्यांचा प्रतिनिधी दिलेल्या वेळेवर कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पुरवठादार स्वत: उपस्थित राहणार नसल्यास कोण प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे याबाबत निविदा उघडण्याच्या किमान तीन दिवस अगोदर पुरवठादाराने अधिकृत लेटर हेडवर सादर करणे आवश्यक राहील. पुरवठाराने लेखी दिलेल्या प्रतिनिधीशिवाय इतर प्रतिनिधीची उपस्थिती ग्राहय धरण्यात येणार नाही.

६. पुरवठारांनी व्यावसायिक दरपत्रके पूर्णपणे भरुन पानांवर सही व शिक्का मारण्यात यावा अन्यथा दरपत्रके ग्राहय धरले जाणार नाहीत. तसेच व्यावसायिक दरपत्रके पूर्ण भरुन पाकीटा बंद करुन त्याच्यावर संस्थेचे नाव व व्यावसायिक दरपत्रके असा ठळक अक्षरात उल्लेख करणे आवश्यक आहे.

७. सदरची ई-दरपत्रक ०१ एप्रिल २०१९ पासून लागू राहील. तसेच माहे एप्रिल - २०१९ ते जून २०१९ या कालावधीसाठी वैध राहील.

८. पुरवठादाराने एकदा तांत्रिक अर्ज पाठविल्यानंतर त्याच पुरवठादाराने दुसऱ्यांदा तांत्रिक अर्ज पाठविल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही.

९. पुरवठादाराने तांत्रिक अर्ज करताना सोबत दिलेल्या तांत्रिक बाबीमध्ये नमूद केलेले कागदपत्रे स्कॅन **(pdf)** करुन संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवरील अर्जान्वये अधिक्षकांच्या **yerwadacanteen19@gmail.com** ई-मेलवर पाठविणे. तसेच त्याची एक प्रत मा. कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या **digwrpune@gmail.com** ई-मेलवर (C.C.) म्हणून पाठविणे. याबाबत कुठलाही फॉर्म देण्यात येणार नाही.

१०. पुरवठादारांनी दोन्ही ई-मेल आयडीवर तांत्रिक अर्ज पाठविल्यानंतर तो न मिळाल्याने वाद निर्माण झाल्यास मा. कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे यांच्या ई-मेल आयडीवर अर्जाची पडताळणी करण्यात येईल. व्यावसायिक दरपत्रक उघडण्यापूर्वी मा. कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या ई-मेल आयडीवर प्रत म्हणून पाठविण्यात आलेल्या अर्जाची माहिती समोर ठेवण्यात येईल.

११. पुरवठादाराने ज्या ई-मेल आयडीवरुन तांत्रिक अर्ज सादर केलेली आहे. त्याच ई-मेल आयडीवरुन झालेला पत्र व्यवहार ग्राहय धरण्यात येईल.

१२. **पुरवठादाराने बयाना रक्कम रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रशासन अधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-०६ यांचे नावे चेकने भरणा करण्यात यावी. सदरची बयाणा रक्कम तांत्रिक अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच भरण्यात यावी. तद्नंतर बयाणा रक्कम भरल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही.**

१३. ई-दरपत्रकाव्दारे प्राप्त झालेले तांत्रिक अर्ज खरेदी समितीसमोर ठेऊन तांत्रिक अर्जाची तपासणी करण्यात येईल. यामध्ये पात्र झालेल्या पुरवठादारांचेच व्यावसायिक दरपत्रके स्वीकारले जातील. अपात्र झालेले पुरवठादारांचे व्यावसायिक दरपत्रके स्वीकारले जाणार नाही.

१४. पात्र व्यावसायिक दरपत्रके निविदा समिती व पुरवठादार यांचे समोर उघडण्यात येऊन त्याचे जाहीर वाचन करण्यात येईल. यामध्ये सर्वात कमी दर असेल त्यांचे वस्तूनिहाय एल-१ काढण्यात येईल. त्यानुसार ज्या संस्थेचे सर्वात कमी दर असेल त्यांना वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी निवड करण्यात येईल.

१५. व्यावसायिक दरपत्रकामध्ये पात्र झालेल्या पुरवठादारास दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करणेबाबतचे आदेश देण्यात येतील. सदरील आदेश मिळाल्यांनतर ७ दिवसाच्या आत पुरवठादारास मंजूर झालेल्या वस्तूच्या मागील तीन महिन्याच्या एकूण देयकाच्या ३ टक्के इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून या कार्यालयाकडे धनादेशाव्दारे जमा करण्यात यावी.

१६. सदर निविदा प्रक्रियेत अपात्र झालेल्या पुरवठादारांनी त्यांचे बयाना रक्कम या कार्यालयातून समक्ष उपस्थितीत राहून १५ दिवसाच्या आत घेऊन जाणे बंधनकारक आहे.

१७. निविदेमध्ये भाग घेणाऱ्या पुरवठादारांनी निविदेमधील नमूद सर्व वस्तूंचे दर भरणे बंधनकारक आहे. यामध्ये अपूर्ण भरलेले दर स्वीकारण्यात येणार नाही.

१८. कारागृहास पुरवठा करण्यात येणाऱ्या दुध व दुग्धजन्य पदार्थ कारागृहाचे उपहारगृहापर्यंत स्वखर्चाने पुरवठादारावर बंधनकारक आहे.

१९. दूध व दुग्धजन्य पदार्थ हलक्या दर्जाच्या व खाण्यास अयोग्य असल्यास ते नाकारण्याचे अधिकार कारागृह अधीक्षक / संबंधीत कारागृहाचे वैद्यकीय अधिकारी यांना आहेत. खराब किंवा नाकारलेले दूध व दुग्धजन्य पदार्थ बदलून देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील व पुरवठादाराचे नुकसान झाल्यास कारागृह प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२०. दूध नाशवंत असल्याने पुरवठा करण्याऱ्या पुरवठादाराने दररोज ताजे दूधाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

२१. कारागृहास पुरवठा करण्यात येणाऱ्या दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळयुक्त नसावे तसे आढळून आल्यास पुरवठादारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२२. निविदेमध्ये प्राप्त झालेले दर हे छापील एम.आर.पी.पेक्षा कमी असावे.

२३. दि. २१.०२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा उघडते वेळीस पुरवठादारांनी हजर रहावे अन्यथा त्यांचे अनुपस्थितीत दरपत्रक निविदा उघडण्यात येईल.

२४. ज्या पुरवठादारांचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असतील त्या पुरवठादाराची वस्तूचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल.

२५. दरपत्रक निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारागृह अधीक्षक यांच्या अधिकार कक्षेत राहील.

२६. कारागृहाच्या मागणीनुसार दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा विहीत वेळेत न केल्यास त्या महिन्याच्या देयकातून २ टक्के दंडात्मक रक्कम वजा करण्यात येईल. निविदा कालावधीत दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा बंद केल्यास आवश्यकतेप्रमाणे स्थानिक बाजारातून जादा दराने खरेदी करावी लागल्यास अनामत रक्कम परत केली जाणार नाही व फरकाची रक्कम पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२७. पुरवठादाराने सर्व करासह अनुषंगिक (Incidental Cost) व वाहतूक खर्च यासह वस्तूंचे दर नमूद करणे आवश्यक आहे. एकदा दर नमूद केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ते वाढवता येणार नाही. खुल्या बाजारात सदरील वस्तूंचे दर / एम.आर.पी. वाढली तरीही पुरवठादारास मंजूर दराप्रमाणेच वस्तूचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२८. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या दूध व दुग्धजन्य पदार्थांवर कुठल्याही प्रकारचा टॅक्स, जकात, वाहतूक खर्च शासनाव्दारे दिला जाणार नाही. उधारीच्या बिलाची रक्कम अदा करण्यास प्रशासनाकडून उशीर झाल्यास त्यावर व्याज देणे कारागृह प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

२९. पुरवठादारांना बिलाची रक्कम ही दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री झाल्यावर अदा करण्यात येईल. तसेच पुरवठादारांना बिलाची रक्कम धनादेश व्दारे अदा करण्यात येईल. पुरवठादारांनी बिलासाठी तगादा लावू नये.

३०. मंजुर निविदाकाराने त्यास मिळालेले कंत्राट इतर कोणासही हस्तांतरीत करता येणार नाही.

३१. कंत्राटमध्ये काही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार निविदा समितीचा राहील व समितीने घेतलेला निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील.

३२. पुरवठादाराला Fssai मार्क असलेल्या व चांगल्या दर्जेच्या दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३३. दूध हे ०.५०० (१/२ लिटर) लिटरच्या पॉलिथीनच्या अधिकृत व चांगल्या प्रतीच्या पिशव्यांमध्ये व दुग्धजन्य पदार्थ हे यादीमध्ये दिलेल्या ग्रॅमप्रमाणे डब्ब्यामध्ये (कप) संवेष्टी असलेले (पॅक केलेले) मागणी प्रमाणे पुरवठा करावा लागेल याची नोंद घ्यावी.

३४. खरेदी प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे शासनाचे अधिकार अबाधीत राहतील.

३५. जाहीर निविदेमध्ये प्राप्त झालेले दर हे स्थानिक बाजारातील चालू स्थितीतील दराशी तुलना करुनच स्वीकारण्यात अथवा नाकारण्यात येतील.

३६. दूध व दुग्धजन्य पदार्थांकरीता शासकीय दुग्धशाळा जिल्हा व दुग्ध उत्पादन संघ व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी व खाजगी पुरवठादार भाग घेऊ शकतील.

३७. पुरवठादार व उत्पादक वरील सर्व अटी पाळण्यास असमर्थ ठरल्यास त्यांच्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(यु.टी.पवार)
अधीक्षक
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे

# तांत्रिक बाबी

अ) ई-दरपत्रकातील तांत्रिक अर्जासोबत खालील कागदपत्रे स्कॅन करुन **(pdf)** पुरवठादाराच्या अधिकृत लेटरहेडवरील अर्जासह दिलेल्या ई-मेल आयडीवर पाठविणे बंधनकारक आहे.

१. दुकान अधिनियमानुसार नोंदणीकृत / कंपनी ॲक्ट व भागीदारी संस्थेने नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. दुकानाचे शॉप ॲक्ट प्रमाणपत्र चालू वर्षाचे नुतनीकरण प्रमाणपत्र.

३. मागील वर्षातील आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र / आयकर रिर्टन विवरणपत्र सादर करणे.

४. संबंधीत संस्थेच्या मालकाचे / भागीदाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत देण्यात यावी.

५. पुरवठाधारक संस्थेकडून संस्थेच्या नावाचे पॅनकार्ड व जी.एस.टी. नोंदणी क्रमांक देण्यात यावा.

६. मागील वर्षात जी.एस.टी. भरल्याची पावतीची छायांकित.

७. अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे यांचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्री व वाहतूक परवाना (FSSAI Certificate)

८. बयाना रक्कम भरल्याची पावती सादर करणे.

(यु.टी.पवार)
अधीक्षक
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे

# येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-०६ (उपहारगृह विभाग)
# माहे एप्रिल २०१९ ते जून २०१९ (दूध व दुग्धजन्य पदार्थ यादी)
## (व्यावसायिक दरपत्रक)

| अ. क्र. | वस्तूचे नांव | परिमाण | दर |
|---|---|---|---|
| | दूध खालीलप्रमाणे | | |
| १ | चितळे दूध | १ लिटर | |
| २ | स्वाभिमानी दूध | १ लिटर | |
| ३ | गोकुळ दूध | १ लिटर | |
| | दुग्धजन्य पदार्थ खालीलप्रमाणे | | |
| १ | चितळे कंपनीचे दही (२००मिली कप) | १ नग | |
| २ | चितळे कंपनीचे श्रीखंड (५०० ग्रॅम कप) | १ किलो | |
| ३ | चितळे कंपनीचे साधा ताक (५०० मिली पाऊच) | १ नग | |
| ४ | चितळे कंपनीचे लस्सी (२०० मिली पाऊच) | १ नग | |
| | | | |
| १ | स्वाभिमानी कंपनीचे दही (२००मिली कप) | १ नग | |
| २ | स्वाभिमानी कंपनीचे श्रीखंड (५०० ग्रॅम कप) | १ किलो | |
| ३ | स्वाभिमानी कंपनीचे साधा ताक (५०० मिली पाऊच) | १ नग | |
| ४ | स्वाभिमानी कंपनीचे लस्सी (२०० मिली पाऊच) | १ नग | |
| | | | |
| १ | गोकुळ कंपनीचे दही (२००मिली कप) | १ नग | |
| २ | गोकुळ कंपनीचे श्रीखंड (५०० ग्रॅम कप) | १ किलो | |
| ३ | गोकुळ कंपनीचे साधा ताक (५०० मिली पाऊच) | १ नग | |
| ४ | गोकुळ कंपनीचे लस्सी (२०० मिली पाऊच) | १ नग | |

टिप :- वरील नमुन्यात दर नमूद करुन सिल बंद पाकीटात घेऊन येणे.

**(यु.टी.पवार)**
अधीक्षक
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे